**स्थायी निदेश क्र.१०**

**अध्यक्ष व मुख्याधिकारी यांचे कर्तव्य सभेच्या विषयासंबंधी.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**

**गृहनिर्माण भवन, तळ मजला,**
**कलानगर वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.**
**क्र: नपसु/२००१/प्र.क्र.६/२००१/५**
**दिनांक :१५ जानेवारी २००१.**

वाचा : १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.एमआयएस/सीओडी-१०६८/३३६५, दि. ६ मार्च १९६८.
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.सीओडी-१४८७/प्र.क्र.४२/५, दि. ८ जुलै १९८७.
३) या कार्यालयाचे पत्र क्र.संकीर्ण १०८९/सीआर ७३/८९/३, दि. ३० सप्टेंबर १९८९.

विविध नगरपरिषदांच्या कामकाजाच्या तपासणीच्यावेळी, लेखापरिक्षणाच्यावेळी व विविध चौकशी प्रकरणांत असे निदर्शनास आले आहे की, नगरपरिषदांनी संमत केलेले काही ठराव महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या तरतुदी लक्षात घेता एकतर अधिकार क्षेत्राबाहेरील होतात किंवा नगरपरिषदेस आर्थिकदृष्टया अनावश्यक व न परवडणारे ठरतात.

०२. नगरपरिषदेच्या कामकाजाच्या संबंधात नगरपरिषदेच्या वतीने घेण्यांत येणारे निर्णय जर प्रशासकीय, वित्तीय व कायदेशीररित्या परिपूर्ण असतील तरच नगरपरिषदेच्या निर्णयाची परिणामकारक अंमलबजावणी वेळीच होवू शकते तथापि अशा त-हेने सर्व तरतूदींचा समावेश करुन परिपूर्ण असलेले ठराव होत नसल्याने नगरपरिषदांवर विनाकारण आर्थिक बोजा वाढत जातो. वास्तविक मुख्याधिकारी हे नगरपरिषदेचे मार्गदर्शक व सल्लागार आहेत, ते केवळ नगरपरिषदेच्या सभेचे कार्यवृत्त टिपून घेणारे कारकुन नाहीत. याची पूर्ण जाणीव सर्व मुख्याधिका-यांना असणे अत्यंत आवश्यक आहे. मुख्याधिका-यांनी आपली ही भूमीका व्यवस्थीतपणे न बजाविल्यामुळे नगरपरिषदांमध्ये वरील प्रमाणे ठराव संमत होत असल्याचे निदर्शनास येते.

०३. नगरपरिषदा किंवा त्याखालील विविध समित्या हया योग्य निर्णय घेणारे प्राधिकारी आहेत व त्यांना असे निर्णय घेण्याच्या दृष्टीने कायदेशिर सल्ला देण्याचे कर्तव्य मुख्याधिकारी यांचे आहे. यादृष्टीने प्रशासनात मुख्याधिकारी यांचे स्थान अधिक जबाबदारीचे व अतिशय महत्वाचे असते. नगरपरिषदा अधिनियम, त्यातील नियम, उपविधी आणि शासनाकडून किंवा संचालनालयाकडून वेळोवेळी देण्यांत आलेल्या सूचनांचा विचार करुन या सर्वांच्या संदर्भात नगरपरिषदेस मार्गदर्शन करण्याचे कार्य मुख्याधिकारी यांनी पार पाडावयास पाहिजे. त्याचप्रमाणे नगरपरिषदेपुढे व समित्यांपुढे विचारार्थ येणा-या प्रत्येक प्रस्तावावर निर्णय घेण्यापूर्वी त्याचे होणारे प्रशासकीय, आर्थिक व कायदेशीर परिणाम मुख्याधिकारी यांनी सर्व सदस्यांच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे. जर प्रस्तावात आर्थिक बाबींचा संबंध असतील तर त्याचा योग्य तो अभ्यास करुन व नगरपरिषदेजवळ असलेल्या साधनांचा, उपलब्ध निधीचा व अंदाजपत्रकातील तरतूदीचा विचार करुन तो प्रस्ताव परिणामकारकरित्या अंमलात आणता येईल अगर कसे हे नगरपरिषदेच्या/समितीच्या निदर्शनास आणण्याचे मुख्याधिका-यांचे प्राथमिक कर्तव्य ठरते.

०४. या संबंधात सर्व अध्यक्ष व मुख्याधिकारी यांचे लक्ष महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमाचे कलम १०१ चे पोट कलम ७ कडे वेधण्यांत येत आहे. या पोटकलमाच्या तरतुदीनुसार अर्थसंकल्पात तरतूद असल्याशिवाय आणि नगरपरिषदेकडे अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार प्रत्यक्षात निधी उपलब्ध असल्याशिवाय आर्थिक बाबीविषयीचे प्रस्ताव मंजूर केले जाणार नाही याची अध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी खबरदारी घ्यावयाची आहे.

०५. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ८१(१०) अन्वये कोणत्याही सभेमध्ये अध्यक्षांच्या परवानगीशिवाय कोणतेही कामकाज चालवता येत नाही. विषय समितीच्यां वा स्थायी समितीच्या सभेसाठीसुध्दा हीच तरतूद लागू आहे. अशारितीने कोणते कामकाज चालवावे हे ठरविणे अध्यक्षांचे किंवा सभेचे काम चालविणा-या पीठासीन अधिका-याच्या अधीन असते. कोणत्याही विषयावर प्रशासकीय, वित्तीय व कायदेशीरदृष्टया मुख्याधिका-यांचे काय म्हणणे आहे याचे सर्व सभासदांना ज्ञान व्हावे आणि मुख्याधिका-यांचे अभिप्राय लक्षात घेवूनच प्रत्येक

विषयावर निर्णय घेण्यांत यावा ही नगरपरिषदेच्या प्रशासनाच्यादृष्टीने महत्वाचे बाब असल्यामुळे अध्यक्षांनी विषय पत्रिकेवर येणा-या विषयाबाबत मुख्याधिकारी यांना मत प्रकट करण्याची संधी दिल्याशिवाय कोणतेही विषय कामकाज पत्रिकेवर येवू न देणे श्रेयस्कर आहे. यासाठी मुख्याधिका-यांनी प्रकट केलेले प्रत्येक विषयावरील मत नगरपरिषदेची वा समितीची बैठक सुरु होण्यापूर्वी सर्व सभासदांना मिळेल याची अध्यक्षांनी काळजी घेतली पाहीजे.

०६. नगरपरिषदांनी आर्थिक व धोरणात्मक विषय आयत्या वेळेच्या विषयांमध्ये मंजूर करु नये अशा सूचना या कार्यालयाच्या संदर्भ क्र. ३ मधील परिपत्रका अन्वये देण्यांत आल्या आहेत. या शिवाय आयत्या वेळेचे विषय घेणे अगदीच अपरिहार्य असेल तर तो प्रस्ताव कायदेशीर किंवा शासनाच्या आदेशानुसार आहे किंवा नाही तसेच तो विषय सभेच्या विषय पत्रिकेवर का घेता आलेला नाही व त्या विषयावर निर्णय घेणे पुढील बैठकीपर्यंत कां थांबता येणार नाही, याविषयी मुख्याधिका-यांचे व अध्यक्षांचे स्पष्ट अभिप्रायासह आयत्यावेळेची विषय सूची सर्व सभासदांना सभा सुरु होण्याचे किमान दोन तास अगोदर पुरविली पाहिजे. मात्र कोणत्याही परिस्थितीत अधिनियमाच्या, नियमांच्या किंवा शासन आदेशाचे विरुध्द ठराव करता येणार नाही. अशा प्रकारचे ठराव घेतल्याने नगरपरिषदेच्या होणा-या आर्थिक हानीची ठराव मंजूर करणा-या सभासदांवर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९६ अन्वये जबाबदारी निश्चित करुन कलम १४९, व १५० मधील तरतुदींनुसार नुकसान भरपाईची रक्कम वसुल केली जाईल. याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

०७. महाराष्ट्र नगरपरिषदा (सभेचे कामकाज) नियम १९६६ चा नियम १७ (३) व २४ (२) अन्वये नगरपरिषदेचे जे ठराव, अधिनियम, किंवा त्यातील नियम व उपविधी यांचेशी सुसंगत नसतील व त्यावर नगरपरिषद निधीमधून खर्च होणार असेल तर सभेमध्ये मुख्याधिका-यांना त्यांची त्यावरील मते प्रदर्शित करता येतात. याच नियमांच्या नियम ४० (३) नुसार मुख्याधिका-यांचे अभिप्राय सभेच्या वृत्तात लिहिणे बंधनकारक आहे, परंतु या विषयी दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे दिसते. त्यामुळे प्रत्येक विषयावरील टिपणी मुख्याधिकारी यांनी नमूद केलेले व सभेत तोंडी मांडलेले अभिप्राय सभेच्या वृत्तांत जसेच्या तसे नमूद करावे.

०८. मुख्याधिका-यांचे अभिप्रायाशिवाय कोणतेही विषय सभेत मंजूर केल्यास त्या ठरावांची जशीच्या तशी अंमलबजावणी करणे मुख्याधिका-यांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच अशा ठरावांविषयी प्रशासकीय, आर्थिक व कायदेशीर परिणामाची छाननी करुन व वैधावैधता तपासूण मुख्याधिका-यांनी अशा ठरावाच्या अंमलबजावणी विषयी निर्णय घ्यावा. प्रशासकीय, आर्थिक व कायदेशीर परिणामाचा विचार करता आयत्या वेळेच्या ठरावाबाबत कायदेशीर कार्यवाही करणे नगरपरिषदेच्या दृष्टीने हिताचे नाही असे जर मुख्याधिका-यांचे मत असेल तर त्यांनी अशा ठरावावर कार्यवाही न करता तात्काळ जिल्हाधिका-यांना ठराव तसेच त्यावरील मुख्याधिका-याचे मत लेखी कळवावे, त्याबाबत जिल्हाधिका-यांकडे पाठपुरावा करुन वेळेत मार्गदर्शन घ्यावे व जिल्हाधिका-यांचे निर्णयानुसार कार्यवाही अनुसरावी.

०९. मुख्याधिका-यांनी आपली भूमीका नगरपरिषद कारभारात प्रभावीपणे बजाविणे अभिप्रेत आहे. म्हणून मुख्याधिका-यांनी काळजीपूर्वक प्रत्येक विषयावर प्रशासकीय, आर्थिक व कायदेशीरदृष्टया परिपूर्ण अभिप्राय देण्याची दक्षता घ्यावी. मुख्याधिका-यांचे कामाचे गोपनीय अहवालासाठी मुल्यमापन करताना अशा प्रकारची भूमीका त्यांनी प्रभावीपणे बजाविली किंवा नाही हे यापुढे लक्षात घेण्यात येईल. मुख्याधिका-यांनी आपली बाजू नगरपरिषदांच्या सभांमध्ये प्रभावीपणे मांडली किंवा नाही याचा विचार जिल्हाधिकारी यांनी मुख्याधिका-यांच्या गोपनीय अहवाल पुनर्विलोकन करताना करावा व तशी सुस्पष्ट नोंद त्यांचे गोपनीय अहवालात करावी.

१०. हे स्थायी निदेश मिळाल्याची पोंच द्यावी व याचे नगरपरिषदेच्या सभेत वाचन करुन त्याची नोंद कार्यवृत्तांत घ्यावी.

( भगवान सहाय )

संचालक

नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,